नगरपरिषद प्रशासन संचालनालय
७वा मजला, बेलापूर भवन, नवी मुंबई महानगरपालिका इमारत,
सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई – ४००६१४

नपप्रसं २०२६/ वैशिष्ट्यपूर्ण विशेष अनुदान /प्र.क्र./कक्ष-७/2207258 दिनांक- 13 APR 2026

वाचा:-१)नगर विकास, शासन निर्णय क्र-संकिर्ण-२०२५/प्र.क्र.७६(भाग-२)नवी-१६,दि. २८ मार्च, २०२५.
२)नगर विकास, शासन निर्णय क्र-संकिर्ण-२०२५/प्र.क्र.७६(भाग-२)नवी-१६,दि.४ एप्रिल, २०२५.
३) नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक:-नपावै-२०२५/प्र.क्र.२८५(३)/नवी-१६(ई-१४९३६०५) दि.२५ मार्च,२०२६

**राज्यातील नगरपरिषद/नगरपंचायत यांना सन २०२४-२०२५ साठी "नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान" योजनेअंतर्गत निधी वितरीत करण्याबाबत. लेखाशीर्ष (४२१७ ०६०३) रक्कम रु.५९,२०,०००/ (एकोणसाठ लक्ष वीस हजार फक्त) निधी वितरण आदेश क्र.२१.**

नगर विकास, शासन निर्णय संदर्भ क्र-१ व २ अन्वये सन २०२४-२०२५ या वित्तीय वर्षासाठी नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान योजनेअंतर्गत (४२१७ ०६०३) राज्यातील नगरपरिषद / नगरपंचायती यांना शासनाने वेळोवेळी आदेशीत केल्यानुसार निधी वितरीत करण्याकरिता संचालनालयास निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच सदर निधी हा वित्त विभाग ,शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय,दिनांक-६ जून,२००८ मधील तरतुदीप्रमाणे खर्च करणे बंधनकारक राहील असे संदर्भ क्र.३ च्या शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आलेले आहे.त्यानुषंगाने कार्यवाही करावी.

त्यानुषंगाने संदर्भ क्र.३ च्या शासन निर्णयान्वये खालील नमूद करण्यात आलेल्या विवरण पत्रातील "परिशिष्ट अ" मध्ये नमूद करण्यात आलेल्या लेखाशीर्ष खालील नमूद नगरपरिषद यांना त्यांच्या समोर नमूद करण्यात आलेल्या संबधित नगरपरिषदेस **रक्कम रु.५९,२०,०००/-(एकोणसाठ लक्ष वीस हजार फक्त)** इतका निधी सोबत नमूद करण्यात आलेल्या विवरण पत्रातील परिशिष्ट "अ"मध्ये नमूद करण्यात आलेल्या जिल्हाधिकारी /जिल्हा प्रशासन अधिकारी/जिल्हा सह आयुक्त (संबंधित), जिल्हाधिकारी कार्यालय यांना नगरविकास विभाग नवि-१६ कडील शासन शुद्धीपत्रकाद्वारे वितरीत करण्याचे आदेशीत केलेनुसार संबंधितांनी कळविलेल्या त्यांच्या बँक खातेवर निधी वितरीत करण्यात येत आहे.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **परिशिष्ट-अ** | | | | | | |
| **आदेश क्र.२१** | | | | | | |
| **सन २०२४-२५ आर्थिक वर्षाकरिता नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान योजना लेखाशीर्ष (४२१७०६०३) अंतर्गत निधी वितरण.** | | | | | | |
| **अ.क्र.** | **जिल्हा** | **स्थानिक स्वराज्य संस्था** | **निधी वर्ग करण्यात आलेले कार्यालय** | **आदेश क्रमांक व दिनांक** | **रक्कम (आकडे रुपयात)** | **रक्कम (आकडे अक्षरात)** |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| **नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक:-नपावै-२०२५/प्र.क्र.२८५(३)/नवी-१६(ई-१४९३६०५) दि.२५ मार्च,२०२६ अन्वये निधी वितरण** | | | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | नाशिक | इगतपुरी | जिल्हाधिकांरी/ जिल्हा प्रशासन अधिकारी,नाशिक | नपावै-२०२२/प्र.क्र.१५७(७)/नवी -१६ दि.३०.०८.२०२२ | 59,20,000.00 | **रुपये एकोणसाठ लक्ष वीस हजार फक्त फक्त** |
| **एकूण रक्कम रु.** | | | | | 59,20,000.00 | **रुपये एकोणसाठ लक्ष वीस हजार फक्त फक्त** |

शासनाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील विहित केलेल्या कार्यपद्धती, सर्व अटी व शर्ती लागू राहतील. त्यांचे काटेकोरपणे पालन करून जिल्हा सह आयुक्त व महानगरपालिका यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास सादर करावा. तसेच, वितरीत करण्यात आलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र संबधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करण्यात यावे व सदर उपयोगिता प्रमाणपत्राची एक प्रत संचालानालायास सादर करण्यात यावी. सदर निधी कामावर खर्च करण्यामुळे आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही,याची संबधित जिल्हाधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

सदर निधी खात्यात जमा झाल्यानंतर, ७ दिवसात निधी प्राप्त झाल्याची पोहोच संचालनालयास सादर करावी. आपली पोहोच प्राप्त न झाल्यास संचालनालय आदेशान्वये आपले कार्यालयास निधी प्राप्त झाला आहे असे ग्राह्य धरण्यात येईल.

मा. आयुक्त तथा संचालक, न.प.प्र.सं. यांच्या मान्यतेने.

(संजय काकडे )
सह आयुक्त
नगरपरिषद प्रशासन संचालनालय,मुंबई

प्रत-

१. प्रधान सचिव, नगरविकास विभाग -१६, मंत्रालय, मुंबई -३२.
२. संबंधित जिल्हाधिकारी / जिल्हा प्रशासन अधिकारी , जिल्हाधिकारी कार्यालय.
३. संबंधित विभागीय सह आयुक्त, विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक कार्यालय.
४. संबंधित मुख्याधिकारी, नगरपरिषद.